# जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त

दिनांक २७.०८.२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रच समिती, छ. संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, छ. संभाजीनगर येथे जिल्हा निर्यात प्रचालन सं सभा संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रच समिती यांनी उपस्थितांचे स्वागत करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यात आली. सभेस उप असलेल्या अधिकारी/कर्मचारी व औद्योगिक संघटनेचे पदाधिकारी यांची यादी सोबत जोडली आहे.

१. जिल्हा निर्यात प्रचालन समितीची मागील सभा दि. २१.०६.२०२३ रोजी संपन्न झालेली आहे. तसेच सभेचे इतिवृत्त सर्व संबंधितांना पाठविण्यात आल्याचे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, छ. संभाजीनगर यांनी सांगितले. सदर इतिवृत्तामध्ये कोणतेही बदल नसल्यामुळे इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.
२. मागील सभेतील प्रलंबित असलेल्या विषयावर चर्चा करणे.

| अ क्र | कार्यवाही संबंधित कार्यालय | विषय | दि. २७.०८.२०२४ रोजी झालेला निर्णय |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा उद्योग केंद्र, छ. संभाजीनगर | मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे | मागील दि २१.०६.२०२३ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त महाव्यवस्थापक यांनी वाचून दाखवले. सर्वानुमते इतिवृत्त कायम करण्यात आले. |
| २. | | जिल्ह्यात होत असलेल्या निर्यातीच्या बाबत संकलित केलेल्या माहितीवर चर्चा करणे. | सचिव तथा महाव्यवस्थापक यांनी जिल्ह्यातून होणाऱ्या निर्यातीबाबत औद्योगिक संघटना आणि सल्लागार यांच्या मदतीने Export Action Plan सविस्तर प्राप्त झालेली माहिती संकलित करून समिती समोर ठेवण्यात आली. |
| ३. | | जिल्हा निर्यात आराखड्यावर सविस्तर चर्चा करणे. | District Export Action Plan मधील संकलित माहितीवर मुद्देनिहाय चर्चा करण्यात आली. |

शेवटी सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, छ. संभाजीनगर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने जिल्हा निर्यात प्रचालन समितीची सभा संपन्न झाली असे जाहीर केले.

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, तथा सदस्य सचिव,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा,
छ. संभाजीनगर

मा. जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा,
छ. संभाजीनगर